चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी, चंद्रपूर सन २०१९-२० (२४१५ १०७७) अंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) करिता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.१५७/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३१ मे, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:बीयुडी-२०१९/२४१५/प्र.क्र.५८/ब-१, दि.०१.०४.२०१९
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:वनबां-२०१९/प्र.क्र.१५७/फ-९, दि.१६.०४.२०१९
४. प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१३/(१९-२०)/२५८, दिनांक २७.०५.२०१९

प्रस्तावना :-

चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी, चंद्रपूर या अकादमीकरीता सन २०१९-२० या वर्षामध्ये "चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी, चंद्रपूर (२४१५-१०७७)" या लेखाशिर्षाअंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) उपशिर्षाकरिता रु.९०९.०० लक्ष व ३६- सहाय्यक अनुदाने (वेतन) या उपशिर्षाकरिता रुपये ९१.०० लक्ष असे एकूण रु.१०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करुन दिलेले आहे.

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये मागणी क्र.सी-७, २४१५-कृषिविषयक संशोधन व शिक्षण" या मुख्य लेखाशीर्षाखाली दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सन २०१९-२० "चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी चंद्रपूर" (२४१५-१०७७) या लेखाशिर्षांतर्गत मंजूर व अर्थसंकल्पीत नियतव्ययाच्या अनुषंगाने ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) रु.९०९.०० लक्षपैकी रु.३०३.०० लक्ष व ३६-सहाय्यक अनुदाने (वेतन) रु.९१.०० लक्षपैकी रु.३०.३३ लक्ष असा एकूण रु.१०००.०० लक्षपैकी रु.३३३.३३ इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.३ अन्वये ३६-सहाय्यक अनुदाने (वेतन) करीता रु.३०.३३ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

अर्थसंकल्पीत निधीच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर त्यांचेकडून संदर्भ क्र.४ अन्वये (२४१५-१०७७)" या लेखाशिर्षाअंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) शिर्षातर्गत रु.७२८.४० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी संदर्भ क्र.४ नुसार सादर केलेला प्रस्ताव व वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील परिपत्रक व संदर्भ क्र.२ चा शासन निर्णय विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, “चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी चंद्रपूर (२४१५-१०७७)” या लेखाशिर्षाअंतर्गत चंद्रपूर वन अकादमीकरिता अर्थसंकल्पीत निधीच्या मर्यादेत ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) रु.३०३.०० लक्ष इतका निधी (२४१५-१०७७) या लेखाशिर्षा अंतर्गत खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्ग्रपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना ध्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.
२. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
३. नियंत्रक प्राक्कलन अधिकाऱ्यांनी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या मुदतीत त्यांच्याकडे सुपुर्द केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत खर्च जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
४. नियंत्रक अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, एकूण वितरीत केलेल्या/करण्यात येणाऱ्या तरतूदीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
५. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
६. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.
७. संस्थेने आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये मंजूर व वितरीत अनुदानाच्या मर्यादेत खर्च सिमित ठेवावा.
८. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
९. संस्थेने मागील वर्षाकरिता त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापालांना तात्काळ सादर करावे. त्याचप्रमाणे, आता वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशिलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र देखिल (Utilization Certificate) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२ नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

१०. चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी चंद्रपूर यांनी उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरीता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

११. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

१२. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.

१३. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ चे परिपत्रकातील अटींची व महसूल व वन विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१४. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक-सी-७, प्रधानशिर्ष- २४१५- कृषिविषयक संशोधन व शिक्षण, ०६-वनीकरण, २७७-शिक्षण (००) (०३) चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी चंद्रपूर (कार्यक्रम) (२४१५-१०७७) ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०१.०४.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५३११५०८१३२०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYKUMAR
VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b1fa488256513b9e2a5b0085040486cc2b67ff77bb697c031c8d3ba4aaf6e350, postalCode=400032, street=4 TH FLOOR,MANTRALAYA ANNEXURE BLDG,MADAM CAMA ROAD,MUMBAI, serialNumber=1e8a52fc7907817fd27a6f930b32f785394ccf71e961f74377a96cf067b3d824, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIJAYKUMAR VASUDEO PATIL
Date: 2019.05.31 15:10:43 +05'30'

(वि.वा.पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर
५. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

६. संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी चंद्रपूर
७. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८. सह सचिव/उपसचिव,वित्त विभाग (अर्थ-३)/(व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
९. उप सचिव, नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०.कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११.कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)